!! श्री !!

शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

## शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४०८ ०४/१२/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे संपुर्ण कर्ज माफ करा शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांची लोकसभेत आग्रही मागणी

**संभाजीनगर ( ता.०४ ) :** गेल्या चार वर्षापासुन मराठवाडा गंभीर दुष्काळाशी सामना करतोय मराठवाड्यातील आठ जिह्यात जानेवारी पासुन ९९७ आत्महत्या झाल्या आहेत, दोन केंद्रिय पथकांनी पाहणी केली. ३३ टक्के सुध्दा पीकांचे उत्पादन झाले नाही. आता तरी मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे पूर्ण कर्ज माफ करा अशी आग्रही मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी लोकसभेत केली.

लोकसभेच्या आजच्या दिवसाच्या कामाची सुरुवात शेतकऱ्यांच्या कर्जाच्या प्रश्नावर झाली. शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी शेतकऱ्यांची विदारक अवस्था लोकसभेत मांडली वर्षभरात आत्महत्येचा आकडा हा एक हजाराच्यावर पोहचला असुन गेल्या चार वर्षापासुन शेतकऱ्यांना गंभीर दुष्काळाचा सामना करावा लागत आहे. हे विदारक चित्र दोन वेळा केंद्राच्या पाहणी पथकाच्याही निदर्शनास आले अनुभवावरुन मिळाले आहे. आता तरी केंद्रशासन मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे कर्ज माफ करेल का असा सवाल लोकसभेत उपस्थित केला. त्यावर केंद्रीय अर्थराज्यमंत्री जयंतसिन्हा यांनी आपल्या मागण्या व सुचनांचा केंद्र सरकार गांभीर्याने विचार करेल आश्वासन दिले.

शिवसेना सातत्याने शेतकऱ्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभी आहे, शिवसेना पक्षप्रमुख उध्दवजी ठाकरे यांनाही शेतकऱ्यांना सातत्याने दिलासा देण्यासाठी मदत वाटप केले शिवसेना शेतकऱ्यांच्या हक्कासाठी, मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी आम्ही वेळोवेळी आवाज उठवत आहोत असे खासदार चंद्रकांत खैरे यांनी सांगितले आहे.

**प्रसिध्दी प्रमुख**

**योगेश पायघन / गणेश वाघ.**

कार्यालय : "खैरे निवास", वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com ,
8484066606/9604384400/

yp4329@gmail.com
7769052525